**नक्षलग्रस्त भागाच्या विकासाचा वि[illegible]**
**गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर व गोंदिया या चार जिल्हयांक[illegible] [illegible]धिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात [illegible] समन्वय समितीच्या कामकाजात सुधारणा [illegible]सहाय निधीत वाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन.**
**नियोजन विभाग.**
शासन निर्णय क्रमांक : नविका - १००९/ प्र.क्र. ६८ /का-१४१५,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १७ डिसेंबर, २००९.

वाचा :
(१) शासन निर्णय,नियोजन विभाग,क्रमांक : नवियो-१००१/प्र.क्र. ५५/ का-१४५६, दि. १८ फेब्रुवारी, २००२,
(२) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक : नवियो-२००६/प्र.क्र.५४/ का-१४५६, दि. १८ मे, २००६,
(३) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक : नविका - १००५/ प्र.क्र. २२६/का.१४५६, दि. २८ मार्च, २००७.

**<u>प्रस्तावना :</u>**

राज्यातील गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, यवतमाळ व नांदेड या सहा जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी दि. ३१ मे, २००९ च्या शासन निर्णयानुसार विशेष कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नक्षल समस्या ही केवळ कायदा व सुव्यवस्थेशी निगडीत समस्या नसून सामाजिक प्रश्नांमधूनही निर्माण झालेली असल्याने तिचा पूर्ण बिमोड करण्यासाठी सामाजिक सुधारणा सुध्दा आवश्यक आहेत. नक्षलग्रस्त भागातील विकासाचे प्रश्न त्वरीत न सुटल्यास तेथील प्रशासनावरील लोकांचा विश्वास कमी झालेला असतो आणि प्रशासन व तेथील जनता यामध्ये दुरावा निर्माण झालेला असतो. अशावेळी विशेष कार्यक्रमांतर्गत नक्षलग्रस्त भागातील लोकांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांच्या अडचणींचे त्वरित निराकरण झाल्यास दुरावा कमी होऊन प्रशासनावर पुन्हा विश्वास निर्माण होऊ शकतो. नक्षलग्रस्त भागातील जनतेचा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याशी तसेच पोलिसांशी संबंध येत असतो. शासकीय यंत्रणेच्या भेटीच्या काळात जनता संपर्काच्या वेळी स्थानिक नागरिकांकडून बऱ्याच लहान लहान समस्या सांगितल्या जातात. त्यामधील काही समस्या स्थानिक पातळीवर व अल्प कालावधीत दूर होऊ शकतात.

सहा नक्षलग्रस्त जिल्हयांमध्ये सर्व भाग समप्रमाणात नक्षलग्रस्त नसून काही भागात नक्षल कारवाया जास्त असल्यामुळे ते अतिसंवदेनशील ठरतात. गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर व गोंदिया या जिल्हयांतील विशेषत: नक्षलग्रस्त भागातील स्थानिक पातळीवरील समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी या चार जिल्हयांच्या तातडीच्या कामाकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक : नविका - १००५/ प्र.क्र. २२६/का.१४५६, दि. २८ मार्च, २००७ अन्वये स्थापन करण्यात आली आहे. या चार जिल्हयांतील समित्यांच्या अधिकारात सुधारणा करण्याबाबतचा तसेच या योजनेचा लाभ विशेषत: अतिसंवेदनाशील नक्षलग्रस्त क्षेत्रातील नक्षलबाधीत लोकांना देण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. या अनुषंगाने तसेच वरील क्रमांक ३ येथील शासन निर्णय क्रमांक : नविका १००५/ प्र.क्र.२२६/ का.१४५६, दि. २८ मार्च, २००७. अधिक्रमित करुन सविस्तर सूचना या सुधारित शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

प्रकल्प अधि—

**शासन निर्णय :**

**समितीची रचना -**

गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर व गोंदिया या जिल्हयांतील विशेषत: नक्षलग्रस्त भागातील स्थानिक पातळीवरील समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर व गोंदिया या प्रत्येक जिल्हयासाठी खालीलप्रमाणे स्वतंत्र समिती राहील.

| | |
|---|---|
| १) संबंधित जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) जिल्हा पोलीस अधीक्षक | सदस्य |
| ३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४) जेष्ठ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| ५) उप वन संरक्षक | सदस्य |
| ६) जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य- सचिव |

२. नक्षलग्रस्त तालुक्यातील काही गावांत वाहतुकीची साधने नसल्यामुळे चार महिने त्यांचा प्रशासनाशी संबंध तुटतो. तसेच काही गावांत कुपोषणाचे प्रसंग, स्वच्छ व शुध्द पाण्याची सोय नसणे, आरोग्य केंद्रापासून दूर असलेले, पावसाळ्यात रोजगार न देता येणारी, अंगणवाडी नसलेली इ. गावे **अतिदुर्गम** ओळखणे शक्य आहे. तसेच ज्या भागात नक्षल कारवायांमुळे विकासाची कामे करण्यास अडथळे निर्माण होतात, कंत्राटदार / शासकीय अधिकारी जाण्यास तयार नसतात अशा भागाला **अतिसंवेदनशील** भाग म्हणून ओळखणे शक्य आहे. वरील चार जिल्हयांतील नक्षलग्रस्त तालुक्यांपैकी उपलब्ध माहितीनुसार अतिदुर्गम, अतिसंवेदनशील व इतर तालुके खालीलप्रमाणे आहेत :-

| जिल्हा | अतिदुर्गम / अतिसंवेदनशील असलेले तालुके. | इतर नक्षलग्रस्त नसलेले तालुके |
|---|---|---|
| चंद्रपूर | गोंडपिपरी, राजुरा, कोरपणा | चंद्रपूर, जीवती, बल्लारशा, पोंभुर्णा, मुल, सावली |
| गडचिरोली | धानोरा, अहेरी, एटापल्ली, सिरोंचा , मुलचेरा, व भामरागड | गडचिरोली, आरमोरी, कुरखेडा, देसाईगंज, चार्मोशी, कोरची,मुलचेरा |
| गोंदिया | सालेकसा, देवरी, अर्जुनीमोरगांव | तिरोडा, गारेगांव, सडकअर्जुनी, गोंदिया, आमगांव |
| भंडारा | ---- | साकोली, लाखांदुर |

३. अतिदुर्गम व अतिसंवेदनशील प्रकारामध्ये समाविष्ट असलेल्या गावांच्या उपरोक्त यादीचा पुनर्विचार करुन त्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार शासन निर्णय क्र.नविका-२००९/प्र.क्र.(३८)/का.१४१६, दिनांक ४ जून,२००९ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष व विभागीय आयुक्त यांच्या शिफारशीप्रमाणे नियोजन विभागास राहतील.

**निधीची तरतूद-**

४. गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर व गोंदिया चारही जिल्हयाच्या समित्यांना आदिवासी विकास विभाग तसेच नियोजन विभागाकडून दरवर्षी पुढीलप्रमाणे निधी उपलब्ध करण्यात येईल.

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | जिल्हा | दरवर्षी उपलब्ध करुन दयावयाचा निधी | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | आदिवासी विकास विभाग | नियोजन विभाग | |
| १ | गडचिरोली | २०० | ३०० | ५०० |
| २ | भंडारा | २०० | ३०० | ५०० |
| ३ | चंद्रपूर | २०० | ३०० | ५०० |
| ४ | गोंदिया | २०० | ३०० | ५०० |
| | **एकूण** | **८००** | **१,२००** | **२,०००** |

५. वरील उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी कमीत कमी ७५% निधी नक्षलग्रस्त भागाच्या **"अतिदुर्गम व अतिसंवेदनशील"** या क्षेत्रामध्ये खर्च करण्यात यावा.

**कामाच्या निवडीसाठी मार्गदर्शक सूचना -**

६. नक्षलग्रस्त भागातील जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, उप वन संरक्षक व जिल्हा नियोजन अधिकारी तसेच त्यांचे कनिष्ठ अधिकारी जिल्हयाच्या वेगवेगळया भागात दौरे करीत असतात. त्यांच्या भेटीच्या काळात स्थानिका लोकांशी प्रत्यक्ष संपर्क साधल्यावर नागरिकांकडून बऱ्याच लहान लहान समस्या सांगितल्या जातात. यापैकी काही अडचणीचे त्वरीत निराकारण झाल्यास प्रशासनावर लोकांचा विश्वास संपादित होऊ शकतो म्हणून या समस्या सोडविण्यासाठी सामुहिक विकासाच्या सुविधा निर्माण करणाऱ्या खालील सामुहिक लाभाच्या योजना /सुविधा या योजनेअंतर्गत अनुज्ञेय करण्यात येत आहे.

१) गावासाठी/वस्तीपर्यंत जोडरस्ते.
२) गावातील मुख्य सिमेंट कॉंक्रिट/डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते (नाली बांधकामासह)
३) शाळेचे कंपाउंड बांधणे, दुरुस्ती करणे, शाळेला इतर सोयीसुविधा पुरविणे.
४) पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, पाणी पुरवठा योजना सुधारणे/बळकटीकरण करणे. बोअर करणे, हातपंप बसविणे, सबमर्सिबल पंप बसविणे, सार्वजनिक हाळ/हौद बांधणे.
५) बंद गटार बांधणे, नाल्या-मोऱ्या बांधणे.
६) आदिवासी वस्तींचे विद्युतीकरण, मार्ग दिप बसविणे, अपारंपारिक उर्जाव्दारे सार्वजनिक स्थळी मार्ग दिप बसविणे. ( ज्या गावांमध्ये वीज नाही अशा गावांमध्ये )
७) समाजमंदिर बांधणे, वाचनालय, व्यायामशाळा स्थापना करणे.
८) स्मशान भुमी बांधकाम.
९) नदीकाठची संरक्षण भिंत, घाट बांधणे.
१०) तिर्थक्षेत्र व पर्यटन विकास
११) ग्रामपंचायत कार्यालय / ग्राम सचिवालय बांधणे / दुरुस्ती करणे.
१२) अंगणवाडी बांधणे / अंगणवाडीला सोयीसुविधा पुरविणे.

७. वरील दर्शविलेल्या कामांव्यतिरिक्त त्या भागातील स्थानिक गरजेनुसार सामुहीक विकासाची कामे घेण्याचे अधिकार वरील समितीला राहतील. तथापि कोणत्याही परिस्थितीत वैयक्तिक लाभाच्या योजना किंवा खाजगी व्यक्तींच्या जमिनीवरील कामे या कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात येऊ नयेत.

८. सदर योजनेअंतर्गत घ्यावयाच्या कामांमधील दुरुस्तीच्या कामाची किंमत रु. १ लाख व बांधकाम व इतर कामांची किंमत रु. ५ लाखापेक्षा जास्त नसावी. अपवादात्मक परिस्थितीत या मर्यादपेक्षा जास्त खर्चाची कामे

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | जिल्हा | दरवर्षी उपलब्ध करुन दयावयाचा निधी | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | आदिवासी विकास विभाग | नियोजन विभाग | |
| १ | गडचिरोली | २०० | ३०० | ५०० |
| २ | भंडारा | २०० | ३०० | ५०० |
| ३ | चंद्रपूर | २०० | ३०० | ५०० |
| ४ | गोंदिया | २०० | ३०० | ५०० |
| | **एकूण** | **८००** | **१,२००** | **२,०००** |

**५.** वरील उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी कमीत कमी ७५% निधी नक्षलग्रस्त भागाच्या **"अतिदुर्गम व अतिसंवेदनशील"** या क्षेत्रामध्ये खर्च करण्यात यावा.

**कामाच्या निवडीसाठी मार्गदर्शक सूचना -**

**६.** नक्षलग्रस्त भागातील जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, उप वन संरक्षक व जिल्हा नियोजन अधिकारी तसेच त्यांचे कनिष्ठ अधिकारी जिल्हयाच्या वेगवेगळया भागात दौरे करीत असतात. त्यांच्या भेटीच्या काळात स्थानिका लोकांशी प्रत्यक्ष संपर्क साधल्यावर नागरिकांकडून बऱ्याच लहान लहान समस्या सांगितल्या जातात. यापैकी काही अडचणीचे त्वरीत निराकारण झाल्यास प्रशासनावर लोकांचा विश्वास संपादित होऊ शकतो म्हणून या समस्या सोडविण्यासाठी सामुहिक विकासाच्या सुविधा निर्माण करणाऱ्या खालील सामुहिक लाभाच्या योजना /सुविधा या योजनेअंतर्गत अनुज्ञेय करण्यात येत आहे.

१) गावासाठी/वस्तीपर्यंत जोडरस्ते.
२) गावातील मुख्य सिमेंट काँक्रिट/डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते (नाली बांधकामासाह)
३) शाळेचे कंपाउंड बांधणे, दुरुस्ती करणे, शाळेला इतर सोयीसुविधा पुरविणे.
४) पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, पाणी पुरवठा योजना सुधारणे/बळकटीकरण करणे. बोअर करणे, हातपंप बसविणे, सबमर्सिबल पंप बसविणे, सार्वजनिक हाळ/हौद बांधणे.
५) बंद गटार बांधणे, नाल्या-मोऱ्या बांधणे.
६) आदिवासी वस्तींचे विद्युतीकरण, मार्ग दिप बसविणे, अपारंपारिक उर्जाव्दारे सार्वजनिक स्थळी मार्ग दिप बसविणे. ( ज्या गावांमध्ये वीज नाही अशा गावांमध्ये )
७) समाजमंदिर बांधणे, वाचनालय, व्यायामशाळा स्थापना करणे.
८) स्मशान भुमी बांधकाम.
९) नदीकाठची संरक्षण भिंत, घाट बांधणे.
१०) तिर्थक्षेत्र व पर्यटन विकास
११) ग्रामपंचायत कार्यालय / ग्राम सचिवालय बांधणे / दुरुस्ती करणे.
१२) अंगणवाडी बांधणे / अंगणवाडीला सोयीसुविधा पुरविणे.

**७.** वरील दर्शविलेल्या कामांव्यतिरिक्त त्या भागातील स्थानिक गरजेनुसार सामुहीक विकासाची कामे घेण्याचे अधिकार वरील समितीला राहतील. तथापि कोणत्याही परिस्थितीत वैयक्तिक लाभाच्या योजना किंवा खाजगी व्यक्तींच्या जमिनीवरील कामे या कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात येऊ नयेत.

**८.** सदर योजनेअंतर्गत घ्यावयाच्या कामांमधील दुरुस्तीच्या कामाची किंमत रु. १ लाख व बांधकाम व इतर कामांची किंमत रु. ५ लाखापेक्षा जास्त नसावी. अपवादात्मक परिस्थितीत या मर्यादपेक्षा जास्त खर्चाची कामे

मंजूर करण्याचे अधिकार समितीला असतील. तथापि, अशा अपवादात्मक परिस्थितीची कारणे स्प अभिलेखात नमूद करणे आवश्यक राहील.

९. या योजनेच्या संदर्भात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत:-

i) या योजनेखाली शासनाने उपलब्ध करून दिलेला निधी खर्च करणे एवढाच उद्देश नसून या योजना प्रत्यक्षात नक्षलग्रस्त क्षेत्रातील गावांच्या विकासासाठी व त्यांना पुरवावयाच्या सुविधा त्या वस्त्यांपर्यंत विहित निकषाप्रमाणे / मानकाप्रमाणे /दर्जेदारपणे / दिर्घ मुदतीपर्यंत कार्यान्वित आहेत याविषयी संबंधित जिल्हाधिकारी यांचे प्रत्यक्ष संनियंत्रण राहील.

ii) योजना /कामांची निवड करीत असताना संबंधीत वस्त्या/पाडे/वाड्या/गावांसाठी आवश्यक असलेल्या सुविधांचा प्राधान्याने विचार करून त्याप्रमाणे निवड करण्यात यावी. ग्रामपंचायतीने सूचविलेल्या कामांना अग्रक्रम देण्यात यावा.

iii) सूचविलेली कामे जास्तीत जास्त नक्षलबाधित लोकसंख्येला लाभदायी ठरतील याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

iv) सदर कामे/योजना यांची द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

v) जी कामे घ्यावयाची असतील त्यासंबंधात ती कामे ज्या प्रशासकीय भागाशी निगडीतअसतील त्या विभागाने ठरवून दिलेले निकष ( नॉर्म्स) व मानके ( स्टॅण्डर्ड) यांचे अनुपालन होणे आवश्यक आहे.कोणत्याही परिस्थीतीत ठरलेले निकष व मानके यात बदल करण्याची मुभा राहणार नाही.

vi) आर्थिक मर्यादेत मंजूर करण्यात आलेली कामे त्याच आर्थिक मर्यादेत पूर्ण करण्यात यावीत. कामे अपूर्ण राहिल्यास ग्रामपंचायतीच्या स्वत:च्या फंडामधून पूरक निधी उपलब्ध करुन घेण्यांत यावा.

vii) आर्थिक वर्षात प्रस्तावीत असलेली कामे त्याच आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत.

viii) कार्यान्वित झालेली योजना प्रत्यक्षात निकषांप्रमाणे पूर्ण झाली आहे/ कार्यान्वित झाली आहे याची वरिष्ठ अधिकारी स्तरावर पडताळणी करावी.

**कामांचे अंदाजपत्रक व मंजुरी**

१०. कामाचे आराखडे व अंदाजपत्रके विविध अंमलबजावणी यंत्रणाकडून तयार करुन घेण्यात यावेत. सूचविलेल्या कामांच्या संदर्भात तांत्रिक मान्यता संबंधित विभागाच्या सक्षम प्राधिका-यांकडून घेणे आवश्यक आहे.तथापि प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे राहतील.

**लेखाशीर्ष-**

११. नियोजन विभागाने उपलब्ध करुन द्यावयाचा निधी विशेष कृती कार्यक्रमाच्या नियमित लेखाशीर्ष क्रमांक ३४५१ सेक्रेटरीएट- आर्थिक सेवा ओ-९, सेक्रेटरीएट (०४) (०१) नक्षलवादी भागासाठी विशेष कृती कार्यक्रम ( योजनांतर्गत ) (३४५११०६५४) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर निधी संबंधित जिल्हाधिका-यांच्या (नियंत्रक अधिकारी) यांच्या अधिनस्त ठेवण्यात येइल.

**निधी वितरण -**

१२. सर्वसाधारणपणे या कार्यक्रमांतर्गत निधीचे वितरण अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीमार्फत (BDS) करण्यात येईल. जिल्हाधिकारी हे प्रशासकीय यंत्रणांना BDS वर निधी उपलब्ध करुन देतील. वित्त विभाग शासन निर्णय क्र. कोषाका १००८/प्र.क्र.८७/कोषा-प्रशा ५, दिनांक १५ ऑक्टोबर,२००८ नुसार कामे पूर्ण झाल्यानंतरच त्याबाबतची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत कामांसाठी अग्रीम रक्कम मंजूर करण्यात येऊ नये.

१३. तथापि, ज्या प्रकरणी निधी उपलब्ध होण्यास विलंब होत आहे व करावयाच्या कामांचे स्वरुप अत्यंत तातडीचे आहे अशाप्रकरणी प्रत्येक जिल्हयासाठी या समितीच्या नावाने यापूर्वी स्वीय प्रपंजी लेखा (PLA) सुरु करण्यात आले आहेत त्यामध्ये निधी जमा करण्यात यावा. सदर स्वीय प्रपंजी लेखा हाताळण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. या खात्याबाबत पुढील अटी लागू करण्यात येत आहेत.

अ) सदर समितीकरिता मंजूर निधीपैकी शासकीय कोषागारातील एकावेळी रु. १०.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी रक्कम काढून स्वीय प्रपंजी खात्यामध्ये ठेवता येईल.

ब) सदर खात्यामध्ये रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी निधी शिल्लक असेल तरच देयके सादर करता येतील.

क) वित्तीय वर्ष अखेरीस या खात्यात शिल्लक असलेला निधी शासन कोषागारात जमा करणे बंधनकारक राहील.

१४. नियोजन व आदिवासी विकास विभागाच्या मंजूर निधीच्या बाबतीत संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे नियंत्रण अधिकारी राहतील. तसेच संबंधित जिल्हा नियोजन अधिकारी हे नियोजन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे आहरण व संवितरण अधिकारी असतील. सदर निधीच्या खर्चाचा ताळमेळ ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच खर्चाची माहिती वेळोवेळी शासनाला देण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकारी म्हणून त्यांची राहील.

१५. सदरहू शासन निर्णय आदिवासी विकास विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४३७/०९/व्यय-८ दिनांक १५/१२/२००९ नुसार प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

निपुण विनायक

( डॉ. निपुण विनायक )
शासनाचे, उप सचिव.

प्रति :

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
सचिव, आदिवासी विकास विभाग,
पोलिस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलिस महासंचालक, विशेष अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विभागीय आयुक्त, नागपूर,
अपर पोलिस महासंचालक (न.वि.अ.), नागपूर,
आयुक्त, आदिवासी विकास नाशिक,
पोलिस उपमहानिरीक्षक, गडचिरोली, परिक्षेत्र गडचिरोली
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर,
जिल्हाधिकारी, गडचिरोली/ चंद्रपूर /गोंदिया /भंडारा,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली/ चंद्रपूर /गोंदिया /भंडारा,
जिल्हा पोलिस अधीक्षक, गडचिरोली/ चंद्रपूर /गोंदिया /भंडारा,
विशेष कार्यकारी अधिकारी(नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर,
उप वन संरक्षक, गडचिरोली/ चंद्रपूर /गोंदिया /भंडारा,
जिल्हा नियोजन अधिकारी, गडचिरोली/ चंद्रपूर /गोंदिया /भंडारा,
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली/ चंद्रपूर /गोंदिया /भंडारा,